म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. नं.
१८८५

म. ग्रं. सं. ठाणें
विषय
लेखक ना.ना.डोंगरे
सन १८८५
पुस्तकाचें नांव रंगी नायकीण


॥ श्री ॥

वासुदेव नारायण डोंगरेकृत

संगीत

# रंगी नायकीण (प्रहसन).

प्रयोगकर्त्यांकरितां तयार केलें तें.



पुणें येथें आर्यभूषण छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

(सन १८६७ च्या २५ वे आक्टाप्रमाणें रंगभूमीवर प्रयोग करण्याचा व पुस्तक पुनः छापण्याचा वगैरे सर्व हक्क मालकानें आपणाकडे ठेविला आहे).

इसवी सन १८८०.

किंमत [illegible] आणा.

॥ श्री ॥

वासुदेव नारायण डोंगरेकृत

# संगीत रंगी नायकीण

## ( प्रहसन ).

प्रयोगाकरितां तयार केलें

तें

पुणें येथें

'आर्यभूषण' छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

(सन १८६७ च्या २५ वे आक्टाप्रमाणें रंगभूमीवर प्रयोग करण्याचा व पुस्तक पुन: छापण्याचा वगैरे सर्व हक्क मालकानें आपणाकडे ठेविला आहे).

इसवी सन १८८९.

किंमत आठ आणे.

# प्रस्तावना.

" संगीत रंगीनायकीण" हें प्रहसन कल्पित आहे. हें वेश्यागमनप्रवृत्त व दुर्व्यसनी लोकांच्या कृतींचें संक्षिप्त प्रदर्शन आहे असें ह्मटल्यास चालेल. या संगीत प्रहसनांत बहूतकरून सर्व प्रकारचे रसांची छाया मात्र आहे. व्यसनी लोकांची नेहमीची भाषा व त्यांचे थट्टामस्करीचे शब्द हेही या प्रहसनांत कोठें कोठें आढळतील. हल्लींच्या प्रचारांतीलच गोष्टी वर्णन करून त्यांत सदरील दुर्व्यसनाचा चुटका दाखविला आहे. यामुळें संविधानकही अगदीं सोपें आहे असें वाचकांच्या सहज लक्षांत येईल. नाटकाचे जे मुख्य गुण यांत असावेत ते यांत नाहींत तथापि केलेल्या श्रमाचें साफल्य गुणी जनाधीन होय.

वा. ना. डोंगरे.
संगीत नाटककर्ते

श्री

# संगीत रंगी नायकीण प्रहसन.

## अंक १ ला.

जलसा

धृपद-( चौताल-यमनकल्याण ).

चरनन सुख चरों जीव माधव दलन सुख राज्य करो बोन्सी अचल राज्यको राज राज॥ धृ० ॥ धर्ममूरत छत्र बढो लाख मूरत नामलेत कहे मियां परमसेन धन धन धन सुख पावो राज राज १॥

होरी-काफी-दीपचंदी.

पांव लागेकर जोरी, श्याममोसें खेलो न होरी ॥ धृ० ॥ गौचरावत मैनिक सीहूं सासन नंद-की चोरी ॥ सगरी चुनरियां रंगमे न भिजवो इतनी सुनो बात मेरी ॥ १ ॥

पद-भूप-त्रिवट.

मुखसें उठावो हात पिया मोरे ॥ धृ० ॥
शरमाते हो क्युं एजानी आ ओ हमारे सातरे ॥ १॥

ऐशी मुलाकातों मे मजा है जीनेका अये याररे ॥२॥
तुम भीजवां औरमैं भीजवाहूं अ एशकरे दीनरातरे॥३॥

## होरी–काफी.

कैसाथा धीट वोमर्दवा, जो मुवा मोपे सदके हुवा ॥ धृ० ॥ बलजोरी मोसें कीनी डरगरमा गाल-नको मेरे छुवा ॥ १ ॥ काची कुवारी मै डर पोकनारी बोहटटाकटटा बुवा ॥ २ ॥

## गरभा–धुमाळी.

झिरमिर बरसे मेघ भीजी मेरी चूनडली ॥ धृ० ॥ झिरमिर झिरमिर मोला बरसे बनमे नाचे मोररे ॥ आगासी उपर गरभा रमीये छानकरे सीदसेज भीजी मेरी चूनडली ॥ १ ॥

## गरभा–दादरा-मांड.

गोकुळ गामथी गूजरी उतरीरे ॥ धृ० ॥ मारी महीनी मटुकडी उतार रे ॥ अलगोरे जेरे पलो लाग शेरे ॥ काना हूं छूं गोकुलनी गवालनी रे ॥ काना तूं छे गोकुलनो गवालनो रे ॥ काना तुझे ओढन काली कामली रे ॥ १ ॥

## ठुमरी–( जिल्हा ).

ओळ छमी प्यारी तोरे बिना नहीं रहूं ॥ धृ० ॥

सरसवती तोरी चेरी है वापर सदके रहूं ॥ १ ॥
मोहे तूं परसन हो देवी छन छन दुखसुख तोसें कहूं॥ २॥

पद—दादरा-मांड.

मोरे पीतम नाहीं मोरी पीत छोडो रे ॥ पीत छोडो नातो आपनी रीत छोडो रे ॥ धृ० ॥ गनेसरदेवा करूं तुमरी सेवा ॥ सरसवतीसी नाहीं मीत छोडो रे ॥ लछमी सहेली हमारी है पेहेली देखवाको हमरो नाहीं चीत छोडो रे ॥ १ ॥

( पडदा पडतो ).

( सुधर्मा, सुशर्मा, कुकर्मा येतात ).

**सुधर्मा**—( आपणाशीं ).

पद—जिल्हा-धुमाळी.

रंडीबाजी करितो पाजी त्यासि न कोणी राजी रे ॥ त्याजी असतां हांजी हांजी ह्मणती सर्वही गाजी रे ॥ याजी याजी ह्मणेल रंडी थंडिस बंडी जशि राजी ॥ व्यसनानें या व्यसनीं पडतील फजिती होईल ताजी रे ॥ उपदेशा या ध्यानीं न धरि जो पडेल दुर्गतिमाजी रे ॥ १ ॥

**कुकर्मा**—( सुधर्म्यावर रागावून ).

पद—धुमाळी.

बाजिराव तूं मोठा शहाणा घरीं जाउनी

खा भाजी ॥ मूर्खा जा जा फजीतखोरा
रागावेल आजाआजी ॥ मोठा शहाणा
बाईलबुद्धचा कर्मनिष्ठ तूं हो याजी ॥ १ ॥

**सुधर्मा**—

पद—धुमाळी.

गाढवाचा नच उच्चारी लंबकर्ण तो जाणावा ॥
ऐकेना तरि सुजनीं त्यातें पादुकेंचि हाणावा ॥ १ ॥

**कुकर्मा**—( रागावून त्यास मारायास जातो ).

पद—( धुमाळी ).

बलीवर्द हा मत्त जहाला कधिं नच यातें सो-
डावा ॥ लत्ताप्रहारीं पराणीनें वा टोंचुनि
मारावा ॥ १ ॥

( सुधर्म्यास मारून घालवितो ).

**सुशर्मा**—अरे काय वेडेपणा हा !

पद—जिल्हा-त्रिवट.

मूढमती तूं किती अविचारी ॥ कोपूं नको रे
सुहृज्जनावरीं ॥ धृ० ॥ हितचिंतक तो करि
उपदेशा, कोण कुणातें ? कुणि न विचारी ॥ १ ॥

**कुकर्मा**—( रागावून ) काय ह्मणतोस ! त्या बैलानें
जर माझ्यासमोर येऊन रंडीबाजीविषयीं पुनः

उपदेश केला तर मी त्याच्या मानेचा घोटच घेईन हें पक्कें समज.

**सुशर्मा**—मित्रा, खरोखर हें दुर्वर्तन तूं अगदीं सोडून दे ! काय सांगूं ! मला सुद्धां अगदीं कंटाळा आला आहे. अरे लग्नाची बायको सोडून हा घाणेरडा नाद कां ?

**कुकर्मा**—अरे जा रे, तुझ्यासारखे क्षौरी मी पुष्कळ पाहिले आहेत. फार फाजीलपणा करूं नकोस.

**सुशर्मा**—ठीक आहे,उगीच भांडण नको. तूं ह्मणतोस तेंच खरें.

**कुकर्मा**—मित्रा, चल जाऊं, रंगू वाट पहात बसली असेल ! परवां तिणें काय सांगूं थाटमाट केला होता ! अहाहा ! काय तें स्वरूप !

## लावणी.

किति गोड सुभगसुंदरी दिसली ॥ वाटे विधिनें
स्वकरें काया रचिली ॥ किति नाजुक वयानें
कवळी भासे जणुं केतकी पिवळी ॥ भाग्यहीन-
चि जो तिला न आवळी कवळी ॥ १ ॥

( जातात. )

**सुशर्मा**—( आपणाशीं ) हा सावकारपुत्र या **धर्मंडानंदना**च्या संगतीनें खचित धुळीस मिळणार !

हे दुर्मार्गगामी नीच धंदा करणारे लोक श्रीमंतांच्या मुलांस गांठून दुर्व्यसनी करून त्यांच्या संसाराचा घात करतात ! हाय ! हाय ! किती हें नीच कर्म तरी ! त्या मोहक वस्तूपुढें माझ्यासारख्याचा उपदेश ठसणें फारच कठीण आहे. काय त्या बिचाऱ्या आईबापांनीं करावें ? त्याचें लग्न झालें आहे तेव्हां हें तरी एक मोठेंच संकट! काय भयंकर स्थिति ही ! हाय ! हाय ! काय प्रमाद हा ! (निरखून) माझ्या मित्राच्या जीवित्वाचा व संसाराचा नाश करणारा दुष्ट ! कसाब! लांडगा ! **घमंडानंदन** इकडेसच येत आहे तर आपण येथून निघून जावें हें बरें ! ( जातो ).

**घमंडानंदन**—( बाहेर येऊन ) आजकाल माझ्यासारखा सुखी कोण आहे ? कोणीहि नसेल. मोठमोठे लोक ज्या वस्तूंकरतां लाळ घोटीत बसतात अशा वस्तूचा मी ह्मणजे हा पठ्या **घमंडानंदन** उपभोग घेत आहे !! काय सांगूं हा व्यापार बिनभांडवली असून पैशाची रेलचेल ! असो या शहरांतील बहुतेकांस **गंगा, यमुना, नर्मदा, काशी, गोदावरी, सरस्वती,** इत्यादि महातीर्थांतून बुचकळून काढलें ! आतां एक **सुबाहू** या नांवाचा सावकारपुत्र मात्र कोरा करकरीत राहिला आहे. तो माझ्या तडाक्यांत सांपडला कीं काम झालेंच परंतु काय करावें ? तो महा धूर्त व पापभीरु

आहे. तशांतून त्याचे अनुयायी देवभोळे व निर्व्यसनी आहेत. याला युक्ति काय बरें करावी ? हां, बरी युक्ती सुचली. तो गृहस्थ बहुतकरून आपल्या बागेंत सायंकाळीं व्यायाम करण्याकरितां येत असतो. त्या वेळेस **रंगीनायकिणी**ला बरोबर घेऊन जावें. त्याची व **रंगी**ची दृष्टादृष्ट झाली कीं लटपट उडालीच ! ! ( जातो ).

**रंगराव**—( येऊन आपणाशीं ).

पद—कल्याण—त्रिवट.

धन्य असें मी मानव देही ॥ स्वर्गसुखाचा अनुभव घेई ॥ धृ० ॥ प्रीयपात्र मम **रंगी** रंजवी विलसन शिलां सदां तोषवी ॥ युवतीलीला ज्यासि न भुलवी ॥ मूढमती वा जाणुं विदेही ॥ १ ॥ ( **तात्या** आला असें पाहून ) कां **तात्या** मी सांगितलेलें काम झालें वाटतें ?

**तात्या**—होय झालें; सामानाची याद केली त्या यादींद लांकडें घातलीं नाहींत त्याची आठवण असूं द्या असा **रंगाजीं**चा निरोप आहे. व यादीबरहुकूम जिन्नस लवकर पाहिजेत.

**रंगराव**—काय ह्मणतोस त्या यादींत लांकडें नाहींत? कोठें आहे ती माझी याद ( वांचून पहातो ) बरोबर आहे. बरें **तात्या, भिकारशेटी**कडे जाऊन

यादीबरहुकूम जिन्नस घेऊन रंगीकडे जा. शेटजींना सांगा कीं हिशोब करून ठेवा नंतर रुपये मिळतील.

**तात्या**—ठीक आहे. ( जातो ).

**रंगराव**—काय राक्षसी खर्च हा ! पण काय करावें ? पैसे खर्च केल्याशिवाय **रंगी**सारखीं पात्रें मिळणार कोठून ? माझ्यापाशीं तीन लाख रुपये आहेत ते सर्व खर्च होत तोंपर्यंत तर काळजी नाहीं. पुढचें कोणी पाहिलें आहे ! ! ( जातो ).

**कुकर्मा**—( आपणाशीं ).

पद—बिहाग—त्रिवट.

रंगी साठीं रंगेल झालों ॥ गृह धनदारा यांस
मूकलों ॥ धृ० ॥ काय करूं हो रंगी तरुणी ॥
मानसीं भरली तें पासुनी ॥ भ्रांत चित्त अति
प्रमुग्ध झालों ॥ १॥

मित्रा काय सांगू.—

पद—धुमाळी.

रंगी नायकिण सुंदरा ॥ अंगीकार करीना जरा ॥
जीव होईल सदां घाबरा ॥ पंचप्राणही सो-
डुनि जातील या शरीरा ॥ १ ॥

जर तिणें माझा अंगीकार केला नाहीं तर मेल्यावर खरोखर माझी वासना राहील ! ! अग रांडेचे पोरी माझे पैसे घेऊन मला फसवितेस काय ?

**सुशर्मा**—काय वेडेपणा हा ? अरे तुला हें कसें कळत नाहीं.—

पद—केदारा–त्रिवट.

द्रव्यहीन तूं तुजशीं वळेना ॥ रंगीनायकीण
कधीं ही मिळेना ॥ धृ० ॥ धनिक होउनी
रंडीगृहासीं ॥ जावें उपभोगावें तिजशीं द्र-
व्यचि कारण तुज हें कळेना ॥ १ ॥

तुझ्या जवळ जर पैसा नाहीं तर तुला कोणी ही विचारणार नाहीं. पैसा मिळविण्याची युक्ति काढ, नंतर त्या रंगीची आशा धरून रहा. उगाच जिवाला त्रास करून कां घेतोस ?

**कुकर्मा**—मित्रा काय सांगूं ! तूं सांगतोस तें सर्व खरें आहे; परंतु या गोष्टीला बरेच दिवस लागतील. तशांतून मी अगदीं परस्वाधीन आहें. आई जिवंत आहे तेथपर्यंत कांहीं वळत नाहीं. अरे तूं कां भितोस? माझी मालमिळकत ती तुझीच आहे असें समज. तुला जर माझा विश्वास नसेल तर रोखा लिहून देतों ह्मणजे झालें कीं नाहीं ? चल नाहीं ह्मणूं नकोस. आज संध्याकाळीं आपण दोघे रंगीच्या घरीं गाणें ऐकावयास जाऊं.

सुशर्मा—

पद—बहार–त्रिवट.

ओढाळचि तूं दुर्व्यसनी अती ॥ धृ० ॥
लांपरट मूढा तुझी संगती ॥
व्यसनीं पाडील होईल फजिती ॥ १ ॥
विश्वासातें कुणि नच धरिती
पशुसम मानिति जन त्या हांसति ॥ २ ॥

अरे बाबा पुरे आतां ! ह्या तुझ्या उठाठेवी म-ला नकोत.

कुकर्मा—मित्रा मी तुझ्या पायां पडतों ! एवढें माझें काम कर ! मी तुझे उपकार विसरणार नाहीं ! पहा नाहीं ह्मणूं नकोस ! !

सुशर्मा—तूं माझा जुना स्नेही पडलास याकरतां मी हे तुझ्यावर शेवटचे उपकार करतों समजलास. पुनः जर अशी गोष्ट माझ्यापाशीं काढलीस तर तुझा माझा संबंध रहाणार नाहीं. हें पक्कें समज. ( आपणाशीं ) हे राजश्री पुनः त्या रंगीकडे जा-णार व फजित पावणार (जातात. रंगराव व तात्या येतो).

रंगराव—( आपणाशीं ) अरे मूर्खा घमंडानंदना ! आतां हे कुंटनागिरीचे धंदे आरंभिलेस काय ? मू-र्खा तुला माहीत नाहीं ? ह्या रंगरावाशीं गांठ आहे. केव्हां चिरडून टाकीन ह्याचा पत्ता देखी-

ळ लागूं देणार नाहीं ( तात्याकडे पाहून ) कायरे तात्या आज रंगीच्या घरीं गाणें आहे असें ऐकतों आणि तो घमंडानंदन कांहीं मंडळी घेऊन येणार आहे हें कसें काय ?

तात्या—होय सरकार आज बेत आहे खरा.

रंगराव—कांहीं चिंता नाहीं मी आज खास येतों आणि पहातों कसा काय तमाशा आहे तो ! माझ्या पदरचे पैसे खर्च करून ही रांड दुसऱ्याची धन करणार काय ? ( जातात ).

गुंडोजीबुवा—( येऊन आपणाशीं ) हे रंडीबाज लोक इकडे येत आहेत. आतां यांस गोड लागेल असें भजन सुरू करावें

## भजन.

अहो सदोदित रंगी रंगी ह्मणा ॥ फु-
कट दिवस हा जातो सुना ॥ नर ज-
न्मामधिं रंडीबाजीच्या साधना ॥ करी-
नच तरी भोगिल यमयातना ॥ ब्रह्म-
सुखाचा तेथें अनुभव घे घे हे सज्जना ॥ १॥

( कुकर्मा व सुशर्मा येतात).

कुकर्मा—( नमस्कार करून ) चला बुवा गाण्याला चला.

**बुवा**—छेरे बुवा मी नाहीं येत उगाच कांहीं लाभ नहोतां मार मात्र खावा लागेल. तुह्मी रंगीच्या घ-रीं जाणार ! रंगीच्या यजमानास जर ही बातमी समजली तर तो सर्वांचे कांडात काढील.

**सुशर्मा**—चलाहो ! असें काय भितां ! घमंडानंदनानें व्यवस्था उत्तम ठेविली आहे. तेथें आपल्या मंडळीशिवाय दुसरें कोणीच येणार नाहीं. मर्दा भितोस काय असा. तुझ्याशिवाय गाण्याला रंग येणार नाहींरे ! चल तर खरा! (जातात).

( रंगी नायकीणीच्या महालांत गाणें सुरू आहे. सर्व मंडळी येऊन मजा चालू आहे इतक्यांत रंगराव व तात्या येतात).

**रंगराव**—( कानोसा घेऊन ) गाणें सुरू आहे व मंडळी ही मोठ्या डौलांत व रंगांत आली आहे. ( रंगराव आंत जातो व सर्वांस जोड्यानें मारून हाकून लावितो. सर्वांची दाणादाण उडून पळून जातात ) दुष्टे ! निर्लज्जे ! अधमाधमे माझे पैसे खर्च करून माझ्याशीं अशी लबाडी काय ? बेमान, निम्मकहराम ! असो तुझी माझी हीच भेट समजलीस ! ( रागावून निघून जातो व बाहेर येऊन आपणाशीं ) फार वाईट ! प्रसंगावांचून मनुष्याचा स्वभाव कळत नाहीं. आमच्यासारख्या वेश्याप्रिय दुर्व्यसनी लोकांस प्रत्यक्ष अनुभव आल्यावांचून व इंगा फिरल्यावांचून श-

हाणे होतां येतच नाहीं ! खरोखर व्यसनी मनुष्य काय न करील ! काय सांगूं ! आशा फार वाईट आहे ! रागाच्या आवेशांत रंगीवर रागावून मी निघालों खरा पण तेंच आतां उलटें त्रासदायक होणार. एक गृहस्थ तेलणीवर रागावला आणि सारी रात्र काळोखांत बसला. तशीच अवस्था माझी झाली आहे. स्त्रीलंपट होण्यापेक्षां भगवीं वस्त्रें परिधान करून जावें हें बरें. ( जातो. )

[ नंतर कण्हत व लंगडत असा घमंडानंदन येतो. ]

**घमंडानंदन**—( आपणाशीं ) काय करूं ! आजपर्यंत या रंडीबाजीच्या कामांत मीच काय तो हुषार व कुंटणगिरी काय ती याच पठ्ठ्यानें करावी; परंतु ती घमेंड बाबा आज जिरली खरी. **रंगी**च्या यजमानाच्या हातचा मार नुसतां नव्हे पायपोसाचा खाल्ला हें तोंडानें उच्चारण्यास माझी मला लाज वाटते ! कांहीं चिंता नाहीं. त्या **रंगरावा**नें मला मारलें काय ? त्याचा मी कधींनाकधीं तरी सूड घेईनच घेईन. या मारामारींत वास्तविक पाहिलें असतां माझा मोठा फायदा झाला. तो **रंगराव** स्वभावतः निस्पृह व तिर्सट आहे. तेव्हां प्राण गेला तरी **रंगी** नायकीणीच्या घरीं तो येणार नाहीं. हें तर खास ठरलें. आतां काय विचारतां ! **रंगी**च्या घरीं आम्ही करूं तें प्रमाण ! तिला एक चांगला श्रीमंत

यजमान पाहून देतों ह्मणजे सर्व गोष्टींची रेलचेल! शाबास घमंडानंदना तूं धन्य आहेसरे बाबा!! (जातो).

**सुशर्मा**—(कुकर्म्यास) मित्रा काय सांगू! आज चांगली बहार झाली! त्या रंगीला पाहिल्यापासून मला कांहीं सुचत नाहीं!

## लावणी.

रंगी सुंदरी मनामधिं भरली फार ॥ किती
गोडकंठ तरि जणुं आवाज विण्याची तार ॥
नयन चमकती जशी तरवारीची धार, अति
नाजुक ठेंगणी नार ॥ देखणी गुणाची खाणी
सुकुमार ॥ सिंहकटी मदनरती धाकुटी कि-
ती वानु तारुण्याचा बहार ॥ १ ॥

**कुकर्मा**—नाहींरे नाहीं, कांहीं सुचत नाहीं. फुकट मार मात्र खावा लागला! दुसरें कांहीं नाहीं; परंतु मित्रा.—

## लावणी.

रंगीनें लाविला चुटका, परंतु हा नशीबाचा
फुटका ॥ वाटे कधिं घेईन अधरामृतपाना-
चा घुटका ॥ बैसला मनामधिं झटका ॥ चै-
न पडेना एकही घटका ॥ काय तिचा मज-
वरी लोभ असे हा लटिका ॥ १ ॥

येत असतो. त्याची तुझी दृष्टादृष्ट झाली कीं काम झालें असें समज! मग मी सर्व जुळवून देतों. बाग पहाण्याच्या मिषानें तेथें जाऊं ह्मणजे झालें. ( जातात ).

अंक पहिला समाप्त.

---

## अंक २ रा.

[ रमा सुबाहूची बायको येते ].

**रमा**—कायग ए सद्वे चिमणे? ती भागी, काशी, आणि हिरी आहेत तरी कुठे? जळली तुह्माला काळजी मुळींच ठाऊक नाहीं? ठीकच तुह्माला कसली काळजी असणार? स्वारी येण्याची वेळ झाली. उठा उठा लवकर जा.—

**चिमणी**—बाईसाहेब रागावूं नका. हार, तुरे, गजरे, पानदान, सर्व रंगमहालांत तयारी आहे.

**रमा**—बरें तर, तूं बाहेर बस. मी कांहीं वाचीत बसले आहें. स्वारी आली ह्मणजे मला कळीव.

**सुबाहू**—( आपणाशीं ).

पद–( केदारा–त्रिवट ).

वैभव अनुकूल नाहीं गणना ॥
कुलवधू सुंदर सुहास्यवदना ॥ धृ० ॥

श्रांत मना विश्रांती स्थलि ही ॥
मूल कारण या सुखसदना ॥ १ ॥

**चिमणी**—बाईसाहेब स्वारी आली.

**रमा**—( उठून उभी राहते ) आज स्वारी येण्यास फार उशीर लागला? कुठे इकडेतिकडे जाणें झालें असेल वाटतें? होयच त्याशिवाय उशीर होणार कुठून?

**सुबाहू**— प्रिये आह्माला दुसरीतिसरीकडे मुळींच ठाऊक नाहीं.

पद–( असावरी–त्रिवट ).

नानाविध हे कुतर्क काढुनी ॥ उभय मनातें
दुखविशी निशिदिनी ॥ धृ० ॥ तुजवांचुनी
सखे इतर कामिनी ॥ जननीभगिनी सम
हा मानी ॥ १॥

**रमा**—हें काय बाई! इश्श! दुसरीतिसरीकडे, ही मेलीं अक्षरें तोंडावाटे तरी निघतात कशीं? भोळेपणाच्या प्रश्नास इकडून असें उत्तर मिळालें हें मोठेंच नवल!!

**सुबाहू**—वाहवा!

दिंडी.

पूर्वसुकृत हें काय फला आलें ॥

ईश्वरें हें स्त्रीरत्न मला दीलें ॥
सदाचरणी कामिनी असे गोड ॥
ह्मणुनी माझ्या वैभवा नसे तोड ॥ १ ॥

**रमा**—पुरेबाई ! हें काय ? मी सहज बोलायला गेलें आणि मेली किती तरी त्यावर टीका झाली हो ?

**सुबाहू**–छी ! छी ! वेडे काय हें भाषण ! तुझ्यासारखी बायको विरळाच !

## दिंडी.

नयन पहाती सुरूप कौतुकातें ॥
घेति अनुभव तैं जाणती गुणातें ॥
जरी नाहीं सहवास तरी कैसें ॥
कोण जाणीजे मूळ स्वभावातें ॥ १ ॥

**रमा**—बरें पुरे आतां तारीफ ! पण मी असें विचारतें आज येण्याला उशीर कां लागला ?

**सुबाहू**—कांहीं नाहीं दागिनें खरेदी करण्याकरितां गेलों होतों हेंच कारण ( नोकरास ) कोण आहे रे तेथें ? हैवती ते दागिने व पैठण्या तावदानांत आहेत त्या आणून स्वाधीन कर. प्रिये आतां मी मोतीबागेंत जातों. ( जातो ) ( बागेंत **सुबाहू** पुस्तक वाचीत आहे इतक्यांत **घमंडानंदन** व **रंगी** येते ).

**रंगी**—अहाहा ! काय ही बागेची शोभा !

पद–जिल्हा–त्रिवट.

पुष्पफलानें सुमतरु फुलले ॥
कोमल किसलय त्यांतची हाले ॥ धृ० ॥
मयूरकीरकोकिल बोले ॥
पाहुनि उपवन मन्मन रिझलें ॥ १ ॥

पद—बहार–त्रिवट.

सुगंध शीतल वायु वहाती ।
कामतप्त शरीरांतें निववितो ॥ धृ० ॥
भाग्यवान ते ये स्थलिं येती ।
उपवनक्रीडारसपाना करिती ॥ १ ॥

घमंडानंदन—सुबाहूनामें सावकारपुत्र आहे त्याचा-च हा बाग. तुझ्यासारखीं आधुकमाधुक पात्रें येतील त्यांच्याकरतांच हा तयार केला आहे. तूं जरा येथेंच उभी रहा मी आंत जाऊन सुबाहू आला कीं काय पाहून येतों (जातो).

रंगी—

पद—पूर्वी–त्रिवट.

असे वैभवी तरुण विलासी ॥
कधिं उपभोगिन हेतु मानसीं ॥ धृ० ॥
अनुकुल विधि तरी दर्शन घेईन ॥
घेऊंदे मज नेत्रसुखासी ॥ १ ॥

करून ) कां आपण असे विचारांत कां ? तुमच्या मुद्रेवरून सहज दिसून येतें कीं मनांत कांहीं तरी हेतु धरून मन चंचल झालें आहे.

**सुबाहू**—छे ! छे ! कांहीं नाहीं. बरें पण आपली स्वारी आज इकडे कोणीकडे झुकली ? तो डबा कशाचा ? त्यांत काय आहे पाहूं ?

**घमंडानंदन**—ते दागिने आहेत. रत्नपालशेटीकडून आणले होते. आमच्या यजमानास पसंत नाहींत ह्मणून परत घेऊन जातों.

**सुबाहू**—तुमचे ! यजमान कोण ?

**घमंडा०**—कोण ह्मणजे ! परवां आपली बाग पहाण्याकरतां आले होते ते.

**सुबाहू**—हं हं ! **रंगाजी** होय ! ठीक ! काय हो आपण वयस्क दिसतां आणि आपलें चित्त व्यभिचारमतांत अगदीं गढून राहिलें आहे ! रंडबाज होऊन स्वस्त्रीवर दुर्लक्ष्य हें कृत्य तर अतिनिंद्य आहे व दुःखास व संसारसुखाच्या नाशास कारण आहे. याचा परिणाम चांगला नाहीं.

**घमंडा०**—अहो या गोष्टी अनादिकालापासून चालत आल्या आहेत. हा आपला वेदांत पुरे. संसारांत येऊन विषयभोग घ्यावा. आणि ज्यानें तो अनुभविला नाहीं त्या पुरुषाचा जन्म फुकट आहे. विषयसुखाचा अनुभव जो खरा पुरुष आहे त्यानें घेतलाच पाहिजे. असें पहा, एखादी शंका मनांत आली

तर त्या शंकेचें समाधान करण्याजोगा कोणी भेट-ल्याशिवाय खात्री होईल काय? नाहीं. तर अगदीं सलज्ज, समर्याद, प्रसंगापुरतें मात्र उत्तर देणाऱ्या, संसारश्रमानें श्रांत व निमग्न झालेल्या अथवा साध्याभोळ्या गरती स्त्रियांपासून रतिसुखाची परिपूर्णता कशी बरें होईल?

**सुबाहू**—तुह्मी बोलतां तें सर्व अनुभवावरून खरें दिसतें. पण अशा सुलक्षणी, सुगुणी, रूपसंपन्न, विलासिनी असून तिच्या नादीं लागणाऱ्या गृहस्थास संकटांत न टाकणाऱ्या स्त्रिया वेश्याकुलांत जन्मलेल्या माझ्या पहाण्यांत व ऐकण्यांत नाहींत.

**घमं०**—महाराज मला असें वाटतें आपण महाल सोडून बाहेरली हवा कधींच घेतली नसेल. दुसरें तर काय, हजारों असो, पण शेंकडों तरी उत्तम वेश्या दृष्टीस पडतील. व त्याविषयीं मी आपली खात्री करतों. आज रात्रीस कां होईना. मी तुमच्या घराकडे येईन नंतर दोघे मिळून जाऊं.

( जातात ).

( *रंगी देवपूजा करीत* आहे; शाग्रीत, दासदासी, सफरदायी, गाणें सुरू आहे इतक्यांत **घमंडानंदन** व **सुबाहू** येतात. पूजा आटोप्यावर **रंगी** बाहेर येऊन बसते ).

**सुबाहू**—कां सरकार कशी काय आपली तब्येत?

मी याच शहरांत रहात असून असें रत्न माझ्या दृष्टीआड झालें हें माझें दुर्भाग्यच.

**रंगी**—महाराज मी आपल्या पायांची वटिक म्हटल्यास शोभेल. या दासीला आपण स्तुतीनें चढातां यामुळें मला मात्र भूषण. वरकड मी या स्तुतीस अगदीं पात्र नाहीं. उलट हे चरण आज दृष्टीस पडल्यानें माझ्या जन्माचें मात्र सार्थक झालें.

**घमंडा०**—कां महाराज मी तारीफ केल्यापेक्षां हा खटला वरचढ आहेना? रूपांत, तारुण्यांत, गुणांत मर्यादेंत, गायनांत आणि आचरणांत मिळून ही सर्वोपरी अत्युत्तम आहे कीं नाहीं?

**रंगी**—महाराज ह्या स्त्रियांच्या अंगीं दुसऱ्यास मोह घालण्याचे जे गुण असावेत ते माझ्यांत मुळींच नाहींत. मी केवळ साधीभोळी स्वधर्मावर विश्वास ठेऊन एक्या यजमानाचे निरंतर चरण चुरून राहणारी स्त्री आहें. मला दुसरें कांहीं नको. आह्मांतही आचारविचार आहे.

**सुबाहू**—काय हो हा सभ्यपणा! साधेपणा! आणि मार्मिकपणा! अशा स्त्रियांच्या घरीं पाणी भरीत आहे. हिरा, मोती, सोनें आह्मी अमुक किमतीचे आहों असें सांगत नाहीं, परंतु रत्नपारखी त्याची लगेच परीक्षा करतो. ह्या स्त्रीच्या आंगीं उगाच दृष्टिकटाक्षानें पुरुषांस बाण मारण्याचा अवगुण

इच्यांत मुळींच नाहींत हें मी पक्कें जाणतों. खरें सांगतों तुमची संगती घडावी असा माझा पूर्ण हेतु आहे.

**रंगी**—सरकार आमच्या संगतीनें पापसंचय. आपल्या घरच्या नायकोच्या दर्शनानें पुण्य लागणार अशा घरच्या स्त्रीशीं कपटप्रीती ठेऊन आमच्यासारख्या स्त्रियांवर प्रेम ठेवावें हें नीट दिसत नाहीं. मला आज्ञा होईल तर बाईसाहेबांची चरणसेवा करून रहाण्यास मी तयार आहें; मग जशी मर्जी.—

**सुबाहु**—परमेश्वर सुद्धां प्रत्यक्ष परीक्षा घेऊन नंतर त्यावर प्रीति ठेवितो. खरेंच प्रिये तूं सर्वगुणसंपन्न असून खरा लोभ ठेवण्यास योग्य आहेस. माझें कुटुंबही केवळ लक्ष्मी असून पतिव्रता आहे. पुढेंमागें सर्व गोष्टींचा बंदोबस्त होईल.

**घमंडा०**—वाहावा ! महाराज वाहावा ! आपण इतके हुषार आहां हें मला आतां कळलें ! ! काय हें रंगीच्या घरीं मार्मिक भाषण ? रंगाचे लोट चालले आहेत ! !

**सुबाहू**—अहो मनुष्याचें मन आंतबाहेर स्वच्छ असल्यावर मग त्यांच्याशीं आपण कपटी मन ठेवणें ही गोष्ट फारच वाईट आहे. प्रिये आज गायन ऐकावें अशी माझी इच्छा आहे. मग जशी तुझी मर्जी.—

**रंगी**—मला गाणें चांगलें येत नाहीं. आज आवाज अगदीं बसला आहे. तशांतून इच्छाच असेल तर वेडेंवांकडें ऐकविण्यास मी तयार आहें. आपले चरण या घरीं प्रारब्धानें लागले त्याच वेळीं आह्मी आपल्या इच्छेचें गांठोडें खुंटीस अडकवून आपल्या स्वाधीन झालों.

**घमंडा**—यंर डौल ! याचें नांव सहिष्णुपणा ! किती लीनता ही ! चला तर होऊं द्या प्रारंभ. महाराजांची आपलीही पहिलीच भेट खरी. परंतु त्यांस लवकर घरीं गेलें पाहिजे.

( **रंगी** व तिची बहिण गातात. अत्तरगुलाब पानसुपारी वगैरे थाट सुरू होतो ).

**सुबाहू**—शाबास ! शाबास ! तुह्मी वर्णन केल्यापेक्षां चार काकणे जास्ती रंग आहे. काय हो हिचा बाहेरील थाट व आतांचा थाट कांहीं निराळाच दिसतो. यावेळीं तर आमच्या दृष्टीस ही ऊर्वशीच प्रत्यक्ष उतरून आली आहे असें वाटतें.

**घमंडानंदन**—महाराज ज्यावेळीं जसा रंग तसा जर पात्रांत ढंग नसला तर दंग होऊन त्या पात्राशीं संग करण्याची कोणास इच्छा होणार ?

**रंगी**—( गाते )—

## लावणी

मदनबाण प्रियकरा तुला निरखितां मनीं
खोंचला ॥ रात्रंदिन तुशीं संग घडावा

ध्यास मला लागला ॥ देहभान नचि
उरलें किंचित छंद तुझा रे लागला ॥ धन्य
तुझे मातापितरचि ते ज्यानीं असा निर्मिला
॥पुतळा मदनाचाचि केवळ कधीं कुणी नच
पाहिला ॥ काय पुण्य माझें ग बाई असा
पुरुष देखिला ॥ १ ॥

**सुबाहु**—कां राव या लावणींत तर इणें अगदीं जवळचेंच नातें भिडविलें !

**घमंडा०**—महाराज आणखीं काय काय येथें गम्मत होते, ऐका, कान देऊन ऐका !

**रंगी**—( गाते )—

## लावणी

प्राणसख्या चाल आतां रंगमहालीं ॥
मदन अंगीं संचरूनी जहाली काहाली ॥
चरणीं तुझ्या जडलें चित्त जहालें चंचल ॥
सुंदर मुख तुझें दिसत ज्वानीचा पिळ ॥
मदनमूर्ती सख्या तूझी कांति सोज्वळ ॥
होता मजसि रूपगर्व भ्रांति फीटली ॥

**सुबाहु**—रावसाहेब या गाण्यांत तर इणें फिदा होण्याची कमाल केली ! पुरे करा श्रम फार झाले.

**रंगी०**—जशी आज्ञा—वेडेंवाकडें जसें आलें तसें ऐकाविलें.

**सुबाहू**—वाहवा! फार गम्मत झाली. सफरदायी लोक ही पदरीं चांगले साथ करणारे आहेत.

**सफरदायी**—काय शांगावा म्हाराज हमी तिघी जणांनीं वेंकट नरशीच्या फुड्यांत चाकरी केली, बारावरस शिखले तवां आपल्या पाय बगले. हमे कांहीं बी जानते नहीं. **रंगाजी**ची नोकरी करते पोटाला देते बस्स.

**घमंडा०**—अहो **रंगाजी** आमचे महाराजही गाणें चांगलें जाणतात ह्मणूनच गाण्याला रंग आला.

**रंगी०**—मी तें केंव्हांच ताडलें पण तें गाणे आमच्या कानावर कुठून पडणार? आणि सांगावें कोणी?

**सुबाहू**—कां कां असें कां? तुझी इच्छा असेल तर माझ्या कडून तयारी आहे.

( गाऊलागतो. )

पद ( त्रिवट—वसंत )

तुझें वेड लागलें मजला सुंदरी ॥
मूर्ती भेदली हृदयमंदिरीं ॥ धृ० ॥
आसनीं भोजनीं शयनी दिसशी ॥
कांहीं सुचेना तुजविण मजशीं ॥
संसारीं मनवृत्ती बावरी ॥ १ ॥

( पानसुपारी होते, ताटांत रुपये टाकतात. रंगीजवळ एकांत कांनांत गोष्टी सांगून रजा घेतो. बाहेर येतो इतक्यांत लक्ष्मी येते. )

**लक्ष्मी०**—कां महाराज आज इकडे कोणीकडे पायधूळ झाडली ?

**सुबाहू**—( आपणाशीं ) आतां मात्र कठीण आहेत. गुप्त केलेले कर्म उघडकीस येणार. ( उघड ) अग तूं येथें कुठे ? वाहावा ! बरेंच गांठलेंस ! मी इथें आलों होतों हें माझ्या घरीं कळवूं नकोस बरें. नाहींतर अनर्थ करशील. ( जातात. )

**दुसरा अंक समाप्त.**

---

## अंक ३ रा.

**सुबाहू**—( येऊन आपल्या रागावलेल्या बायकोची समजूत करूं लागतो. )

**पद**–( मुलतानी–त्रिवट ).

रुसलिस फुगलिस कांगे मजवरि । हंसुन बसुन तूं बोलकीं गे ॥ धृ० ॥ कुणी फुंकिले कान तुझे तरी । विपरित वार्ता ऐकविली गे ॥ १ ॥ धरूं नको तूं शंका किमपी हितगुज

मजसीं बोलकीं गे ॥ २ ॥ दे आलिंगन मुख-
चुंबन दे बैस तूं अंकीं सखये गे ॥ ३ ॥

पद—( जिल्हा—दीपचंदी ).

कां ग प्रिये तूं धरिशी अबोला ॥
मजवरती कां राग धरीला ॥ धृ० ॥
काय असा मजपासुनी घडला ॥
मंतु गडे जो त्रासवि तुजला ॥ १ ॥

रमा—( रागावून ).

पद— ( जिल्हा—दीपचंदी ).

रात्रीं कुठे हो तुह्मी रमलां ॥
अशी कोण सवत मिळाली तुह्माला ॥ धृ० ॥
अप्रिय झालें काय तुह्माला ।
कपटभाव हा कांहो धरिला ।
सत्य कथावी मात प्रियेला ॥ १ ॥

सुबाहू—

पद—( त्रिवट—पूर्वी ).

जनमनरंजक नाटकशाला ॥
दावियली म्या सुत्हज्जनाला ॥ धृ० ॥
त्या योगें मज उशीर लागला ॥
क्षमा करीगे या दीनाला ॥ १ ॥

रमा—

पद-( जिल्हा—त्रिवट ).

सत्य नसे जें कारण कथिलें ॥
संशय धरिमन अंतरीं चळलें ॥ धृ० ॥
गणिकेवरिं त्या मानस जडलें ॥
व्यभिचारीं मन कैसें रमलें ॥ १ ॥

सुबाहू—

लावणी.

जिवलगे सुंदरी, कृपाकरीं गे, दीनावरि कां
वांकुडी दृष्टी झालिस खरि बावरी ॥ मद-
नाग्नी हा छळी मलागे जीवन तूं मज आ-
लिंगन दे कोपुं नको अंतरीं ॥ १ ॥

[ रमा कांहीं न बोलतां रागावून जाते ].

---

रंगीचा व माझा स्नेह जडला हें कृत्य मी चोरून केलें असून उघडकीस आलें असें वाटतें.

साकी.

हासत जरि करि कर्म तरि त्या वर्मे कधीं
नच ठावें ॥ सुखानुभ वीपरि अंतीं भोगवी
दुःखा अनुभवी व्हावें ॥ ऐशा ह्या शर्मा,
कोणि न जाणें वर्मा ॥ १ ॥ ( जातो ).

**सुकेतन**—( सुबाहूचा मित्र येऊन आपणाशीं ) अरे मूर्खा **घमंडानंदना** अरे तूं जातीचा ब्राह्मण! त्यांत भिक्षुकाचा मुलगा! असें असून तुला ही अवदसा कशीरे आठवली! रांडांची कुंटणगीरी करतांना तुला लाजरे कशी वाटत नाहीं! पोट जाळण्याकरतां अशीं निंद्य कर्मे करण्यापेक्षां पोटांत कांटे कां घालून घेत नाहींस! मोठमोठ्या श्रीमंतांच्या व सरदारांच्या तरुण मुलांस रंडीबाजीचा नाद लावून त्यांच्या संसाराची व जीविताची वाताहात करून सोडतोस! अरे घमंडानंदना तूं शुद्ध कसाब आहेसरे! बाबा! तेरज्याचा रंग तीन दिवस हें पक्कें समज! माझ्याशीं गांठ आहे समजलास! प्रयत्न माझा आणि नशीब माझ्या मित्राचें! त्याला रंडीबाजीच्या व्यसनापासून सोडवील तर हाच सोडवील हें पक्कें समज. ( जातो ).

**रमा**—( महालांत आपणाशीं ).

**पद**—( जिल्हा—दीपचंदी ).

भीरु मनाया किती समजाऊं ॥ विरहाकुल मी कुणिकडे जाऊं ॥ धृ० ॥ तारुण्याचा भर या देहीं ॥ मदन व्यथाही सोडित नाहीं ॥ जाच करीती नणदा जाऊं ॥ १ ॥

लक्ष्मी—

पद–( जिल्हा–दीपचंदी ).

बहु संतापें मुखकमला तें ॥ त्रास देशिकां को-
मल तनुतें ॥ धृ० ॥ दैवाधीनचि होणे जाणे ॥
भीऊं नकोगे धरिं धीरातें ॥ १ ॥

रमा—अग ! काय सांगू ! खरेंच बाई !

पद–( कानडा–त्रिवट ).

पराधीनचि दुःखद आहे ॥ सुखदायक ही स्त्री
जनि नोहे ॥ धृ० ॥ देव देवाशीं हेंच मागणे ।
स्त्री जन्मामधिं नलगे रहाणे ॥ नर्कवासचि के-
वळ आहे ॥ १ ॥

लक्ष्मी—अग सांग सांग झालें तरी काय ?

रमा—अग तुला एक सांगू कीं दोन सांगू ! एक दिवस येथें कोणी रांडका भांड ह्मणतात आली होती ती भेटल्यापासून इकडचें चित्त अगदींच ठिकाणावर नाहींसें झालें आहे. आणि माझ्या मनांत याविषयीं संशय येऊं नये ह्मणून काय काय प्रकार होत असतात ते किती सांगू ! !

लक्ष्मी—तुमचा तर्क अगदीं खरा आहे. हेंच मी तुह्माला कळविण्याकारितां येणार होतें. या शहरांत **रंगी** ह्मणून कोणीएक नायकीण आहे. तिच्या नादीं आपले यजमान लागले. यामुळें

संसाराची वाताहात होणार. त्या रांडेचें उखळ मात्र पांढरें झालें आहे. हजारों रुपयांची धनीन होऊन बसली आहे.

**रमा**—देवा! देवा! काय हें! आतां सर्व संशय फिटला! ती मेली **रंगी** तिणेच सर्व रंगवून टाकिलें आहे. अग रांड ठेवल्याचें मला दुःख नाहीं पण तूं असें पहा कीं रांडाच्यापायीं कुबेरासारखेही भिकारी झाले मग आमची कथा काय! त्यांतून आमच्या तोंडावरून हात फिरवून खुशामती करावयाच्या आणि त्या रांडेची इच्छा पुरवावयाची! अगबाई! तब्येत अगदीं बिघडत चाललीं आहे. कांहीं विचारलें ह्मणजे नाकानें लिंबू सोलणें होतें!!

**लक्ष्मी**—बरें पण हा नाद सुटणार कसा? याला युक्ति काय?

**रमा**—अग युक्ति ती काय? प्रकृति भिडस्त आहे. एकवेळ सूर्यजयद्रथ होईल तर नीट होणार.

**लक्ष्मी**—तें माझें काम, पण संभाळहो, ती रांड फार मस्तवाल आहे. बाजारच्या रांडा त्या! त्यांना काय! तिथें किती येतात ना किती जातात याचा कुठे पत्ता आहे. ती आतांशा गरोदर आहे. व चारपांच दिवसांत तिचें डोहाळे जेवण होणार आहे. मोतीबागेंत याचकरतां ती आपल्या यजमानाची

भेट घेणार आहे. प्रहर रात्रीच्या सुमारास भेट होईल. तेथें जर गपचूप रंगीचा वेश घेऊन बसाल तर रंगीस ती वेळ टाळून दहा घटका रात्रीस तेथें पाठवितें ह्मणजे तुमचें काम साधेल.

**रमा**—गडे चांगली युक्ति कांढलीस पण सावधगिरी ठेवहो. ( जातात ).

**सुबाहू**—( आपणाशीं ).

पद–( कानडा त्रिवट ).

करूं नये कधीं प्रीति स्त्रियांवरी ॥
प्रीति करी त्या मानी तृणापरी ॥ धृ ॥
अनुरक्ता स्त्री सवें रमावें ॥
विरक्त तीतें सदां त्यजावें ॥
अनुभव घेउनी विटलों भारी ॥ १ ॥

( **लक्ष्मी** आलीसें पाहून ) कांग धांवत धांवत आलीस ? **रंगाजी** काय करीत आहे ? कायग आज गडबड कसली ?

**लक्ष्मी**—महाराज आतां परवांच्या दिवशीं डोहाळे जेवण आहेना ? आज प्रहर रात्रीच्या सुमारास मोतीबागेत **रंगाजी**नें आपणास बलाविलें आहे.

**सुबाहू**—जा स्वारी येणार आहे ह्मणून सांग. ( लक्ष्मी जाते ).

मजवरति हें प्रेम जाणुनी प्रहर्ष त्हृदयीं न समा-
येगे ॥ धृ० ॥ नयन बाण हे त्हृदया भेदिति,
करुणा कैसी तुज नयेगे ॥ १ ॥

जशी विश्वामित्रास भुलविण्यासाठीं इंद्रानें रंभा पाठविली किंवा शृंगीस आणण्याकरितां दशरथानें ऊर्वशी पाठविली त्या दोघीही तुमच्या या थाटापुढें तुच्छ वाटतात. आज या ठिकाणीं भेटण्याचा संकेत ह्मणूनच काय ती ओळख नाहीं तर भयचकितच झालों असतों ह्या थाटमाटापुढें आपण कोंण ही ओळखच पटत नाहीं! अहाहा!! जीवच ओवाळून टाकावा!!

**रमा**—हे वीरपुरुषा! जे कोणी कामदेवाच्या सपाट्यांत आलेले धुंद असल्यानें त्यांस कोणाचीच ओळख पटत नाहीं. पण मला ओळखिलें काय? मी आपली आवडती **रंगी** नव्हे पण नावडती **रमा** आहे!!

( ओळखून **सुबाहू** खालीं मान घालून एकीकडे उभा राहतो ) महाराज आतां साव कोण आणि चोर कोण? आणि ह्यापेक्षां आणखीं मुद्दा काय पाहिजे? स्वारी कुणीकडे आली होती? व संकेत कुणाशीं होता? हें आतां आपणच सांगावें ( रुसून एकीकडे उभी राहते. )

सुबाहू–

पद–( कलिंगडा–त्रिवट ).

प्राण प्रिये हा धर्मचारिणी ॥ धृ० ॥
अपराधी मी क्षमा करीं गे ॥
दास तुझा हानत तव चरणी ॥ १ ॥

( पायां पडतो–**रमा** निवारण करते ).

**रमा**–हें काय मला उलट नरकांत कां टाकतां ! मी आपली दासी आहे,

सुबाहू—

पद–( मालती–त्रिवट ).

वाग्बाण कां हृदया टोंचिशी ॥ क्षमा करावी या दासासीं ॥ धृ० ॥ प्रतरणा म्या केली तुजसीं ॥ तेणें झालों विव्हल मानसीं दयाद्र दृष्टिनें पहा दीनासी ॥ १ ॥

रमा—

पद–( भैरवी–त्रिवट ).

गणिकेवरी मनवृत्ति जडली ॥ सवतीनें त्या भूल पाडिली ॥ धृ० ॥ गणिका प्रसंग विषयापासुनी परत फिरावें हाच हेतु मनी सुदैवें ही युगत सुचाविली ॥ १ ॥

**सुबाहू**—प्रिये क्षमा कर क्षमा कर—

**रमा**—इकुडली वृत्ती ताळ्यावर आली ह्मणजे दोघांसही देव क्षमा करील मी घरीं जातें वरें कां. आपण मागून यावें. अमर्यादेविषयीं क्षमा मागते. ( जाते ).

**सुबाहू**—हाय ! हाय ! काय फजीतीही ! !

पडद्यांत ( फजीता अद्याप झाला कुठे बाबा यापुढें बहार व मजा आहे ).

**सुबाहू**—

पद— ( भैरवी—त्रिवट ).

प्रतिकुलविधिनें नाटक रचिलें ॥
हा प्रारब्धा ! तव गति न कळे ॥ धृ० ॥
दुष्ट शब्द हा कोठुनि होतो ॥
कर्णी कर्कश ऐकूं येतो ॥
काय होईल तें मज न कळे ॥ १ ॥

आणखी दुसरा प्रत्यक्ष फजिता तो कोणता ? प्रत्यक्ष **रंगी** मात्र येण्याची बाकी राहिली आहे. तिची मात्र आतां भेट न होवो ह्मणजे झालें.

**रंगी**—( येऊन ) मला असें वाटलें होतें कीं उशीर होऊन भेट न होतां मागें जावें लागतें पण स्वारी नेता बरोबरच येऊन पोहोंचली.

**सुबाहू**—माझ्या गुलाबाच्या फुला ! तुला काय सांगू दुसरीकडे वेळ चुकल्यास चिंता नाहीं पण येथें एक पळही चुकणें नाहीं बरोबर प्रहर रात्रीस येण्याचा हुकूम होता त्याप्रमाणें आलों.

**रंगी**—वाहावा ! महाराज आपणास विस्मरणानें घेरलें वाटतें प्रहर रात्रीस येण्यास सवड नाहीं दहा घटिका रात्रीस यावें असा आपला निरोप आला हेताना ? आणि हें काय आपण ह्मणतां ?

**सुबाहू**—( चपापून ) अग ह्या सटव्या कुणाविनी कांहीं अशा द्वाड असतात कीं त्यांचें आपल्या कामाकरितां यजमानाच्या कामाकडे दुर्लक्ष्य करतात.

**रंगी**—आपली प्रकृति ठिक नाहीं असें मला वाटतें कारण काय असेल ते असो.

**सुबाहू**—नाहीं नाहीं हवा ठीक नाहीं हेंच कारण. वरें तें असो हे दागिने आणले आहेत घे. तुझ्याच शरीराला हे शोभणारे आहेत.

**रंगी०**—सरकार इतक्या किंमतीच्या दागिन्यास आह्मी पात्र नाहीं; परंतु मजवर माया ह्मणूनच.— आणि आज इतके दागीनें देण्याचें कारण मला ठाऊक आहे. पण बोलायला बाई लाज वाटते !

**सुबाहु**—सांग सांग लाज कशाची ?

**रंगी०**—ऱ : ! लाज आहे तर ! आह्मी वेश्या

झालों ह्मणून लाज सुटली कीं काय ? ज्याचें कर्म त्यास माहित. तें दुसऱ्यानें कसें वरें बोलावें ?

**सुबाहु**—हं हं !! समजलो ; तुमचें डोहाळें जेवण आहे होय ? यांत लाज कसली व चोरी कां ? हा वेडे !!

पद—( भैरवी—त्रिवट )

परस्परीं ही प्रीति मुरली ।।
विषय सुखाची सीमा झाली ।। धृ ।।
मी तुजसीं तूं सखि मजसीं ।।
आमरणांतीं नच अंतरसीं ।।
हेंच विधीनें लिहिलें भाली ।। १ ।।

( जातात )

## ( तिसरा अंक समाप्त· )

---

## अंक ४ था.

**सुबाहू**—( बाहेर येऊन आपणाशीं ).

दिंडी.

द्रव्य देऊन तीजशीं स्नेह केला ।।
सेवे तत्पर हा दास उभा ठेला ।।
धूर्त कोल्हीनें ठकाविलें पहा मातें ।।
फजित झालों सोडिलें लौकिकातें ।। १ ।।

काय रांड लुच्ची तरी ! अरे माझ्याशीं कपट करून मला अखेरीस फशीं पाडलें ! हरामखोर रांड या लुच्चांच्या नादीं लागली काय ? अनुभवी लोकांनीं लिहून ठेविलें आहे तें कांहीं खोटें नाहीं:—

पद—( कानडा-त्रिवट ).

धनलोभी गणिका असती ॥ त्यासाठीं बहु हंसती रडती ॥धृ०॥ दृढ विश्वासां प्रीति दाविती ॥ कामी जनातें या परि फसविती ॥ १ ॥ स्मशान वटिका सम तीस मानिती ॥ अनुभवी कधिं नच स्पर्श करी ती ॥ अथवा कधिं नच दर्शन घेती ॥२॥

हाय ! हाय ! काय फजीती ही ! माझे हित चिंतकांनीं मला उपदेश केला कीं, "अरे काय हा! रंडीबाजीचा नाद ! या पासून अखेरीस नर्कवास ह्मणून सावध हो ! संसाराला व शरीर संपत्तीला मुकशील." ह्याप्रमाणें अनुभव येत चालला खरा. काय हो ? रंगीनें पहिल्याच भेटीच्या प्रसंगीं किती मानभावी पणा दाखविला ! किती प्रेमाचे पाझर सुटले होते ! एका यजमानाची सेवा करून देव धर्मानें रहाणारी आहें; परंतु येथें कशाचा धर्म आणि कशाचें कर्म ! एकसारखी चूल पेटलेली आहेच ! कामाची गती वक्र असून प्रबल आहे असें ह्मणतात तें कांहीं खोटें नाहीं. माझ्या सा-

-रख्या विचारी मनुष्यासहि शेतखान्यांत तोंड घाल-ण्यास लाविते ! **रंगी**ची आठवण झाली कीं वेदांत दूर पळालाच !

पद—( परजकालिंगडा–त्रिवट ).

गणिका **रंगी** बहु मानवली ॥ रति सुख केलि खनि मज सांपडली ॥ ध्रु० ॥ लोभनीय परि कप-टी ठरली ॥ बहुकष्टें तिस आजि म्या त्यजिली ॥ १ ॥

काय चमत्कार ! एकदां वाटतें जीव जावो अथवा राहो सर्व संग परित्याग करून **रंगी**च्याच मागें लागावें; परंतु पुनः लोक रीतीकडे मनवृत्ती गेली कीं स्वप्नवत् उपरती झालीच ! कांहीं असो गणि-का प्रसंगापासून दूर रहाण्याचा निश्चय झाला तो झालाच.

**पडद्यांत**—( चल्, चल्, चल्, चल्, माझ्या काका साबका डंका. असा शब्द होतो ).

**सुबाहू**—( ऐकून ) अरे हें काय गारुड्याचा तमा-शा आला वाटतें ! चला तो पाहून नंतर घरीं जा-ऊं. ( जातो ).

**गारोडी**—( बाहेर येऊन ) चल्, चल्, चल्, चल्, ( ढोलकी वाजवून ) माझ्या धनी साबका डंका ! माझ्या काका साबका डंका ! माझ्या तात्या साब-का डंका ! ( **सुबाहू** आला असें पाहून) वाहवा!

वाहावा ! धनी साब आइये. बहोत अच्छा हुवा ! एक अजायब तोरका खेल बनातांहूं जिस्कुं देखके खुष हो जावो गे ! धनी साब जरा ठेर जाव ! वन, टु, थ्री, फोर, एक, दोन, तीन, चार, एक, बे, तीन, चार, वकट, लेंड, मुंड, आर, ! ! मट्टी डालतांहु फुंक मारतांहूं ! चल् चल् चल् चल् ( पुंगी वाजवून ) अब ए नागोबाका खेल देखो ! वाहावा ! वाहावा ! अरे नागोबा डुलतो ! दुध खायाला मागतो ! नागरपंचमीला शीराळ शेटी-च्या घरामंदीं शिरतो ! अब महाराज, ये सब खेल मै पोते मे रखतांहूं ओर गध्धे का खेल करके दि-खातांहूं मेरेकू पेटभर देना बस्स ! !

**सुबाहू**—बे गारोडी दिल खुष हो ऐसा खेल करेगा तो तेरेकूं अच्छा तरेसें इनाम देऊं गा !

**गारोडी**—अब देखो महाराज कैसा मेरा खेल होता है सो. खेल मेरा ओर बूज आपके तरफ !

( गातो ).

दिल किसीकु देना नाहिं ॥ दिलसें देना दिल ॥
नाहिं मिला तो नाहिं मिला । कम दिलसें मत मिल ॥
क्या पानीका बुडबुडा क्या वालुकी भिंत, क्या
गांडूका आसरा, क्या रंडीकी प्रीत ॥ १ ॥

चल्, चल्, चल्, चल्, आव गध्धे आब ! बहार निकल आव !

( पडद्या बाहेर आशुक माशुक येतात ).

आशुक—

पद—( त्रिवट–कालिंगडा ).

निष्ठुर मन कां मजवरि केले ॥
आजवरीं सखे प्रेम ठेविलें ॥ धृ० ॥
सांग सांग प्रिये काय वर्तलें ॥
राग नको धरूं क्षमा करीं गे ॥
कोमल मुख हें सुकोनि गेलें ॥ १ ॥

माशुक—

लावणी.

आम्ही बाजारच्या कसबिणी ॥ कुणी नाहीं आह्मासीं धणीजी ॥ धृ० ॥ धन देईल तोचि आमुचा धनी ॥ अरे चावटा मेल्या लुवऱ्या, काय बोलसी गोड गुलवण्यावाणी जी ॥ १ ॥

हो दूर हो ! चावट मेला ! जो आह्माला पैसे देईल तोच आह्माला प्यार ! माझ्या नादीं लागून पैशाची उधळ पट्टी केलीत परंतु तुम्ही सासुरवाशी ह्मणून आतां हात सुटा नाहीं माझा खर्च तर मोठा दुसऱ्या कोणाशी स्नेह केला तर तुमची चक्री फिरते. जर शंभर रुपये दरमहा तुझ्याकडून पोहोंचेल तर मी तुमची नाहीं, पेक्षां आपली जुनी

ओळख ह्मणून आठ चार दिवसांनीं पानसुपारी खाण्यास यावें. मी तुमची आहें.

**आषुक**—माझ्या लाडके ! माझ्या सोनटक्या ! मी तुझ्या पायां पडतों ! पदर पसरतों ! तुझ्या नादीं लागून हजारों रुपये खर्च केले. आतां दोन दिवस हात खालीं आहे ह्मणून तूं मला दूर ढकलूं नकोस ! मी तुला पंचवीस रुपये देत जाईन ! मी तुझ्या पांयां पडतों.—( जातात ).

**गारोडी**—धनी साब यह पहिले लंबरका गध्धा देखा ? ध्यानमे रखो ! अब दूसरे लंबरका गध्धा लाताहूं. चल्, चल्, चल्, चल्, चल् दूसरे लंबरके गध्धे आव जलदी आव.—( येतात ).

**आषुक**—प्रिये काय सांगूं ! नाना प्रकारचे ग्रंथ इतिहास पाहिल्यानें ह्या विषयाचा वीट येतो; परंतु पुस्तक बाजूस ठेविलें कीं ध्यान तुझें ! याचें कारण लोहचुंबक शक्ति तुझ्या अंगांत आहे ह्मणून!!

**माषुक**—पुरे पुरे वेदांत माझ्या घरीं येणें असेल तर मला जेवण करून घातलें पाहिजे व माझीं लुगडीं धुतलीं पाहिजेत.

**आषुक**—कांहीं चिंता नाहीं, एवढेंच कीं नाहीं मी तें सर्व करीन.—( जातात ).

**गारोडी**—महाराज यह दूसरे लंबरके गध्धेनें अजायब खेल बताया ध्यानमे रखो ! चल्, चल्, चल्, चल्, तीसरे लंबरके गध्ये निकल आव ! (येतात).

आषुक— लावणी.

ठुमकत चालसी गजगती, कटी बारिक गोमटी ॥ अती सुकुमार तनु वळवळती ॥ वक्षस्थळ वि-शाल कठिण ही दीसती ॥ हरिणिस हे नयन द्वय लाजविती ॥ वाटे घ्यावें मुखचुंबन धीर धरवेना गुंग जहाली मती ॥ १ ॥

हे मनोहर रूप पाहून रात्रंदिवस तुझ्याजवळच बसून रहावेंसें वाटतें. दुसरें तर काय सांगू तुमच्या लाथाही गोड व मृदु लागतात प्रिये माझ्यावर रा-गावूं नकोस प्रेम ठेव मी तुझा दास आहे.

माषुक—चल मेल्या ! रात्रंदिवस कुतऱ्यासारखा दाराशीं बसून राहिला आहेस ! लाज क-शी नाहीं वाटत ! मेल्या तुझ्यामुळें माझा धंदा बुडाला ! कुणी येत सुद्धां नाहीं तुझी कवडी ही मला नको. दमडी देऊन चामडी काढणें मला ना-हीं आवडत समजलास ! चालता हो ! फिरून आ-लास तर शोभा करून घेशील.

आषुक—हाय ! हाय ! धन्य धन्य मी ! किती बोल गोड हे !! प्रिये हे काय बरें असें! (जवळ जातो).

माषुक—मेल्या आलास पुनः आलास जवळ ! ये ये पुढें पाहूं.—( जोडे मारते, जातात ).

गारोडी—महाराज ये बी लाल झगडा ध्यान मे रखो.

अब चोथा गध्धा बतातांहूं ! धनी साब मी तमच्या लेंकरा हाये ! ! दया राखावा पाहिजे ! चल् चल् चल् चल् चौथे लंबरके गध्धे बार निकल आव ! अब महाराज जूती पैंजारका चोथे लंबरका जोरा बाहार आतां है.—( येतात ).

आपुक घमंडानंदन—प्रिये तूं माझेवर कां बरें रागावलीस ?

माषुक—चलहो मेल्या एकीकडे ! पुनः जर माझ्यापाशीं आलास तर पायपोस मिळतील.

घमंडानंदन—अग तुझ्यावर प्रसंग आला त्यावेळीं कोण उपयोगीं पडला याचा कांहीं तरी विचार कर ! चांगले चांगले यजमान कोणी पाहून दिले? रंगरावानें तुला सोडलें त्यावेळीं कशी फें फें झाली होती ? तुझा तळीराम गार झाला आतां माझी तुला गरज नाहीं होय ? मला तूं वचन दिलें होतेंस कीं चांगला यजमान पाहून दिलास तर मी तुला आपल्या गळ्यांतला ताईत करीन ! हें काय बरें ! मी तुझ्या पायां पडतों ! तूं सांगशील तें काम करीन.

माषुक—( लाथ मारून ) जातोस कीं नाहीं मेल्या! पुनः आलास तर मार खाशील समजलास !

घमंडा—( एकीकडे आपणाशीं ) खरोखर रंडीबाज दुर्व्यसनी मनुष्य अनुभव आल्यावांचून इंगा फिरल्यावांचून व मार खाल्यावांचून कधींहि सावध

होत नाहीं हें प्रत्यक्ष आज माझें मला अनुभवास आलें. अखेरीस माझी अशी स्थिती व्हावीना !! फार वाईट ! ( जातो. )

**आपुक**—( येऊन ).

( मुलतानी–त्रिवट. )

क्रोधयुक्त ह्या वदना पाहुनी ॥
भयशंकित मन झालें गे ॥ धृ० ॥
काय असा अपराध घडला ॥
सांग कुणी तुज त्रासाविलें गे ॥ १ ॥

**मापुक**—अरे राग कशाचा, पण तुला विचारतें, आज येण्याला उशीर कां लागला ?

**आपुक**—प्रिये काय सांगूं मी तुझ्या घरीं येतों ही गोष्ट कोणी तरी याझ्या वायकोला सांगण्याची झक मारली त्यामुळें घरांत खुब जुतीपैजार झाली. मी वायकोला साफ सांगितलें कीं मला जर मुद्देमाल पकडशील तर मी तुझे जोडे खायीन असा घरांत मोठा तंटा करून स्वारी झटकली ना काय ?

**मापुक**—ठीक ठीक ! एकूण आज येथें जुतीपैजार होणार. तिणें पक्की पाळथ ठेविल्याशिवाय ही गोष्ट आज घडलीच नाहीं. ती जर कां येथें आली तर माझ्यासारखी कुत्री कोणी नाहीं.

आम्ही रांडा आह्मांला काय! यांत सर्वांची शोभा होऊन सर्वांस तमाशा दृष्टीस पडेल.

**आषुक**—बरें आहे एवढेंच कीं नाहीं दोहोंकडील जोडे सोसण्यास माझें मस्तक तयार आहे तूं कां भितेस ?

[ इतक्यांत त्याची बायको येते. ]

**बायको**—कां महाराज ? आज मुद्दा माझ्याच नाहीं पण या जमलेल्या लोकांच्या दृष्टीस आला कीं नाहीं ? ही कोण ? तुमची मावशी कीं बहीण ? सांगा ? ( रंडीस ) अग बाई ! माझ्या घरावर तूं कां चूड पेटविलेस ! मी तुझें काय घोडें मारलें ? (नवऱ्यास) कां आतां आपलें तोंड कां बंद झालें.

**रंडी**—अग बाई ! आह्मी बाजारच्या रांडा ! बापानें यावें व लेकानेंही यावें ! आह्मास जो पैसा देईल तो आमचा प्रिय. मी तुझ्या नवऱ्यास घरीं कांहीं बोलावूं गेलें नव्हतें. तोच लाळ घोटीत आला ! इच्छा असली तर त्यासच चार खेटरें मारून घरीं घेऊन जा. पण जर बोलशिल तर जन्मांत कधीं ऐकल्या नाहींत अशा शिव्या खाऊन मात्र जाशील.

**बायको**—बाई ! तुझी माझी कांहीं दुस्मानी नाहीं.

नेहमीं शपथा वाहून सांगतो कीं तुझ्या खेरीज सर्व बहिणी आहेत ह्मणून हा फजिता करणें प्राप्त.

**रंडी**—कायरे ए चावटा! मी तुझी बहिण कायरे! मेल्या कोणाला बहीण ह्मणतोस! जा निघून (जोडे मारीत नेतात).

**गारोडी**—क्यौं महाराज कैसा खेल है? यह चार गध्यें मेसें कोहोनसा गध्धा ऊंचा लंबरका है यह आपने दर्याफ्त करके मेरी बूज रखना.

**सुबाहू**—(गारोड्यास बक्षीस देऊन) वहोत उमदा खेल बनाया! वाहावा! क्या बात है! जब फुरसद मिले तब हमारे ह्यां आया करो सम झा (गारोडी जातो) **सुबाहू** (पुढें येऊन) माझें सुदैवच गारूड्याचा वेश घेऊन मला या रंडीबाजीच्या दुर्व्यसनापासून सोडविण्याकरतां आलें यांत संशय नाहीं. असो जें होणार तें कधींही चुकत नाहीं. मी पूर्वीं कोणत्या स्थितींत होतों! माझा लौकीक काय! माझी संपत्ती कीती! तीं सर्व सुखें घरच्या घरीं राहून ह्या रंडीबाजीच्या नादास लागल्या कारणानें वाईट व एकांत स्थानीं कसा फजीत झालों व ह्या गारोड्याच्या तमाशानें शुद्धीवर आलों ही देवाची मोठी कृपा समजली पाहिजे.

पद ( भैरवी–त्रिवट ).

हर्म्यरम्यकुळवधू सुशीला ॥
नव यौवनभर सुंदरी अबला ॥ ध्रु० ॥
वाणी संतत मधुरा विमला ॥
दासदासिजन संपत विपुला ॥ १ ॥
वासुदेव पदीं जो नर रमला ॥
यापरि भोगी सुखविभवाला ॥
धन्य न मानी स्वर्गसुखाला ॥ २ ॥

( जातो. )

चौथा अंक समाप्त.

समाप्त.